# संयुक्त महाराष्ट्राची माहिती

★

SERVANTS OF INDIA SOCIETY LIBRARY
POONA 4

V2-2(P155).N5

V2-2(P155).N5
H8
063449

...षद

# संयुक्त महाराष्ट्राची माहिती

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-063449

संयुक्त महाराष्ट्र परिषद
प्रकाशन ७ वें

तारीख
२५ एप्रिल १९४८

किंमत
तीन रुपये

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | निवेदन .... .... | |
| २ | प्रास्ताविक .... .... .... | १ ते २६ |
| ३ | क्षेत्रविस्तार व लोकसंख्या .... .... | २७ ते ४० |
| ४ | संयुक्त महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न .... | ४१ ते ७२ |
| ५ | संयुक्त महाराष्ट्राची शेती व पिकें .... | ७३ ते १०० |
| ६ | संयुक्त महाराष्ट्रातील उद्योगधंदे .... | १०१ ते १२० |
| ७ | संयुक्त महाराष्ट्राचें हवामान .... .... | १२१ ते १२२ |

# निवेदन

हिंदी संघराज्यांतील मराठी भाषिकांच्या सलग प्रदेशाचा ' संयुक्त महाराष्ट्र ' हा एक नवीन प्रांत निर्माण करण्यांत यावा ही संयुक्त महाराष्ट्र परिषदेची मुख्य मागणी आहे. यासंबंधीं महाराष्ट्रांतील लोकमत जागृत करून ही मागणी शक्य तितक्या लवकर पुरी करून घेण्याचे, म्हणजे नवीन होणाऱ्या हिंदी संघराज्याचे घटनेंतच महाराष्ट्राचा—मराठी भाषिकांच्या प्रदेशाचा एक स्वतंत्र प्रांत म्हणून स्पष्टपणें नामनिर्देश केला जावा असे प्रयत्न संयुक्त महाराष्ट्र परिषद करीत आहे. हा आपला जो नवीन भाषावार प्रांत होणार त्याचें भौगोलिक स्वरूप, त्याची लोकसंख्या, त्याची आर्थिक स्थिति—सरकारी उत्पन्न, शेतीचें उत्पन्न, उद्योगधंदे व व्यापार इत्यादि सर्व गोष्टींची माहिती मराठी भाषिकांना असणें जरूर आहे. त्यामुळें ज्या प्रांताची आपण मागणी करतों त्याचें संपूर्ण चित्र आपल्या डोळ्यासमोर उभें राहतें. भाषावार प्रांतरचना आवश्यक आहे याबाबत फारसें दुमत आढळून येणार नाहीं. ह्या प्रश्नाची तात्त्विक बाजू सर्वांना मान्य असते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत हा प्रांत कसा होईल, दिसेल याचें स्पष्ट चित्र त्यांच्या डोळ्यापुढें नसतें. आणि असें स्पष्ट चित्र दृष्टीसमोर नसल्यामुळें पुष्कळ वेळां ही भाषावार प्रांतनिर्मितीची मागणी एक सत् श्रद्धा ठरते. आपली मागणी पुरी करून घेण्याइतकी कार्यप्रवणता जर ती मागणी करणाऱ्यांमध्यें नसेल तर निव्वळ सत् श्रद्धेनें ती पुरी होणार नाहीं. आपल्या मागणीचें संपूर्ण ज्ञान झाल्यानें ती पुरी करून घेण्यासाठीं आपण कार्यप्रवण होतों. मराठी भाषिकांच्या प्रदेशाच्या नवीन होणाऱ्या प्रांताची संपूर्ण माहिती जर प्रत्येक मराठी भाषिकास झाली तर त्यामुळें तो ह्या नवप्रांतनिर्मितीसाठीं अधिक कार्यप्रवण होईल. महाराष्ट्राचा भाषावार प्रांत निर्माण होणें कां जरूर आहे यासंबंधीं संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें पूर्वी कांहीं पत्रकें प्रसिद्ध केलींच आहेत. इतर लेखकांनींहि वर्तमानपत्रद्वारां अगर स्वतंत्र पुस्तक लिहून या प्रश्नाची चर्चा केली आहे. परंतु संयुक्त महाराष्ट्रासंबंधींची संपूर्ण माहिती आजपर्यंत एकत्रित अशी उपलब्ध नव्हती. अशा संपूर्ण माहितीचें एक पुस्तक प्रसिद्ध करावें असें संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकर्त्यांना पुष्कळ दिवसापासून वाटत होतें. आज ती इच्छा पूर्ण होत आहे. आशा आहे कीं मराठी भाषिकांना ही माहिती वाचून आपल्या भावी नवप्रांताचें स्वरूपदर्शन होईल व हा नवप्रांत भारतीय राज्यसंसारांत शक्य तितक्या लवकर प्रत्यक्ष नांदावा यासाठीं ते आतुर होऊन कार्यप्रवण होईल.

ही माहिती मिळविणें विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या संभाव्य सरकारी उत्पन्नाची माहिती गोळा करणें फार कठीण काम होतें. आज महाराष्ट्र राजकीय दृष्ट्या संघराज्याच्या दोन प्रांतांत अनेक देशी संस्थानांत व गोमंतकासारखा परदेशी राज्यसत्तेखालींही, विभागला गेला आहे. त्यामुळें संयुक्त महाराष्ट्राच्या सरकारी उत्पन्नाचा अंदाज त्यांतील मराठी भाषी जिल्ह्यांचेंच तेवढें सरकारी उत्पन्न एकत्र करून करतां येणें शक्य होतें. मुंबई व मध्यप्रांत सरकारच्या मध्यवर्ती कचेऱ्यांनीं ही जिल्हा-

वार माहिती आम्हांस उपलब्ध होऊं दिल्यामुळें या सरकारी उत्पन्नाचा अंदाज करतां येत आहे. लोकसंख्या, शेती, उद्योगधंदे वगैरे संबंधाची ही माहिती सरकारी शिरगणती अहवाल, शेतकी खात्याचे अहवाल, उद्योगधंद्यासंबंधीं सरकारनें नेम–लेल्या कमिश्यांचे अहवाल व अन्य अधिकृत पुस्तकें व अहवाल इत्यादींवरून मिळ–विली आहे.

ही सर्व माहिती मिळवून व ती एकत्रित करून हें पुस्तक लिहिण्याचें काम संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे संघटक श्री. यशवंत कृष्ण सोवनी यांनीं केलें आहे. सुर-वातीपासून त्यांना या कामीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध अर्थ व राज्यशास्त्रज्ञ आणि पुणें येथील गोखले अर्थशास्त्र व राजकारण संशोधन मंदिराचे संचालक प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं मार्गदर्शन केलें आहे. या पुस्तकाचें हस्तलिखित वाचून त्यांत त्यांनीं योग्य त्या दुरुस्त्या केल्या आहेत. प्रा. गाडगीळांनीं लिहिलेल्या संयुक्त महाराष्ट्रा-संबंधींच्या पत्रकांचाहि या पुस्तकाचे कामीं उपयोग झाला आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविक भागांतलि उपप्रांतांच्या योजनेसंबंधीचा भाग व सीमानिर्णयासंबंधींचा भाग प्रा. गाडगीळांच्या पत्रकांतून जशाचा तसा दिला आहे. प्रा. गाडगीळांनीं परिषदेस केलेल्या या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. म. म. दत्तो वामन पोतदार यांनींहि पुस्तकाचें हस्तलिखित वाचून सूचना केल्या त्याबद्दल त्यांचेहि आभार मानले पाहिजेत.

या पुस्तकाच्या प्रास्ताविक भागांत महाराष्ट्राचा पूर्वेतिहास थोडाफार देण्यांत आला आहे. तो देण्याचा उद्देश मराठी भाषिकामध्यें एकात्मतेची भावना निर्माण होण्यास हा पूर्वेतिहासहि थोडाफार कारणभूत आहे हें दाखविणें एवढाच आहे. महारा-ष्ट्राच्या पुर्वेतिहासाच्या अनुरोधानें ' संयुक्त महाराष्ट्र ' या भाषावार प्रांताची आमची मागणी नाहीं हें येथें स्पष्ट नमूद करणें जरूर आहे. हिंदी संघराज्य प्रभावी व सामर्थ्यशाली होण्याचे दृष्टीनें त्याचे घटक (प्रांत) एकात्म व एकजिनसी असणें जरूर आहे व ही एकात्मता ठरविणारीं जीं कांहीं सर्वमान्य तत्त्वें आहेत तींच आम्ही भाषावार प्रांताची मागणी करतांना पायाभूत म्हणून मानीत आहों. ही एकात्मता ठरविणाऱ्या अनेक लक्षणांपैकीं एकभाषित्व हें एक प्रमुख लक्षण आहे असें आमचें मत आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा एक मोठा नकाशा (२० X ३० इंच दोन रंगी) आम्ही पांचसहा महिपूर्वीच प्रसिद्ध केला आहे. त्याचा ब्लॉक करून तो नकाशाहि या पुस्तकांत दिला आहे.

ह्या पुस्तकाचें परिशीलन करून मराठीभाषी जनता संयुक्त महाराष्ट्र निर्मि–तीच्या कार्यास आम्हांस सहाय्य करील अशी आशा आहे.

शं. द. देव
अध्यक्ष,
संयुक्त महाराष्ट्र परिषद